ISSN 2231-2137

# CONTEMPORARY RESEARCH IN INDIA

A Peer-Reviewed Multi-Disciplinary International Journal

UGC Approved Journal No. 62441, NAAS Score 2018 : 3.23
Impact Factor 2016 : 0.956 (GIF)

## आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेषांक

8 मार्च 2018

“Thus humanity is male and
man defines woman not in
hereself but as relative to him;
she is not regarded as an
authomous being...
She is defines and differentiated
with reference to man and
not he with reference to her;
she is the incidental,
as opposed to the essential.
He is the Subject,
he is the absolute -
she is the other.”
-Simon de Beauvoir

प्रा. डॉ. भारती रेवडकर
विशेषांक संपादक

कंटेपररी रिसर्च इन इंडिया (ISSN: 2231-2137)
बहुशाखीय आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिक
युजीसी मान्यताप्राप्त नियतकालिक क्र. 62441

Scanned by CamScanner

Contemporary Research in India (ISSN 2231-2137): UGC Approved Journal No. 62441 - NAAS Score 2018: 3.23

## CONTENTS


| Sr. No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचे बदलते संदर्भ<br>डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण | 01 |
| 2 | स्त्री–पुरुष समानता: काही अधोरेखिते<br>डॉ. पौर्णिमा शिरिष कोल्हे | 04 |
| 3 | मराठीतील स्त्रीवादी लेखन<br>प्रा. शुभदा शिवपूजे-उपासे | 07 |
| 4 | आजची स्त्री आणि समाजव्यवस्था<br>प्रा. डॉ. विशाल लिंगायत | 11 |
| 5 | Wretched of The Earth: A Face of Poor Indian Women's Misery<br>Manasi G. Swami | 14 |
| 6 | आदिवासी स्त्रियांच्या समस्या आणि उपाय<br>प्रा. डॉ. माहेश्वरी गावित | 16 |
| 7 | स्त्रीपुरुष सुसंवाद–काळाची गरज<br>प्रा. डॉ. भारती रेवडकर | 19 |
| 8 | हिंदु स्त्रीया विषयी संरक्षणात्मक कायदे<br>अॅड. प्रविणा धनाजी सावंत | 23 |
| 9 | Indian Economist : Bina Agarwal<br>Mr. S. B. Shinde | 24 |
| 10 | हिंदी में महिला आत्मकथा लेखन<br>गिरिश काशिद | 27 |
| 11 | मैत्रेयी पुष्पा की कहानियों में नारी समस्या और नारी सशक्तिकरण के परिपेक्ष्य में<br>डॉ. अर्चना शिवाजीराव कांबळे | 31 |
| 12 | जागतिकीकरण : स्त्री आणि स्त्रीवाद<br>प्राचार्य, डॉ. वेदश्री विजय थिगळे | 33 |
| 13 | महिला विषयी असणारे कायदे<br>प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे | 36 |
| 14 | रमाई : तमाम आंबेडकरवाद्यांचे मातृकाव्य<br>डॉ. सारीपुत्र तुपेरे | 38 |
| 15 | महिला सबलीकरण: स्त्रियांचे आरोग्य आणि योगशास्त्राची भूमिका<br>श्रीमती विजया द. जगताप | 40 |
| 16 | मिळूनसाऱ्याजणी : एक सामाजिक चळवळ<br>संजीवनी मुळे | 42 |
| 17 | 'सिझर कर म्हणतेय माती काव्यसंग्रहातील स्त्री जीवन'<br>संतोष मारूती लोंढे | 44 |
| 18 | स्त्री आणि जागतिकीकरण<br>आरती नंदकुमार कोले | 46 |
| 19 | आजची स्त्री व समाज<br>प्रा. सौ. वासंती कुलकर्णी | 49 |
| 20 | आजची स्त्री आणि समाजव्यवस्था<br>सौ. मैत्रेयी मंदार केसकर | 52 |
| 21 | स्त्री आणि आरोग्य<br>डॉ. गौरी कैवल्य गायकवाड | 55 |




Scanned by CamScanner

Contemporary Research in India (ISSN 2231-2137): UGC Approved Journal No. 62441 - NAAS Score 2018: 3.23

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# आजची स्त्री आणि समाजव्यवस्था

प्रा. डॉ. विशाल लिंगायत, सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

**प्रस्तावना :-**

आजच्या समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान काय ? असा प्रश्न विचारल्यास 'स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू असा नियम करून प्रत्येक धर्मातल्या पुरूषाने आपले धर्मातले जे स्थान आहे, ज्या सवलती आहेत त्या बाजूला करून घेतल्या आहेत आणि स्त्रियांना गौण स्थान दिले आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास हिंदू धर्माचे देता येईल. 'पती हाच परमेश्वर ही शिकवण मुलींना लहानपणापासूनच दिली जाते. पतीची सेवा केली पाहिजे, वेगवेगळी व्रते केली पाहिजेत, स्त्रियांनी कसे वागावे, काय खावे, काय घालावे यावर बरेच निर्बंध घातले आहेत. रूढी – परंपरेच्या वाहक सर्व धर्मातल्या स्त्रियाच आहेत. "याचप्रमाणे मुस्लिम धर्मामध्येही 'पती के पाँव के नीचे जन्नत रहती है असा समज रूढ आहे. पती लाथा घालतो, पत्नी लाथा खाते; कारण शेवटी त्याच्या पायाखाली स्वर्ग असतो; त्याच स्वर्गात पत्नीला जागा मिळणार असते.' या आणि अशा कल्पना केवळ स्त्रियांच्या बाबतीत सर्व धर्मात रूढ झालेल्या आहेत. 'स्त्री' च्या माणूसपणाचा विचार हे स्त्रीवादी विचारसरणीचे केंद्रस्थान आहे. 'स्त्री ही प्रथम माणूस, मानव म्हणून जन्माला येते. पण ज्या समाजात तिचा जन्म होतो. तो समाज तिच्याकडे माणूस म्हणून न पाहता 'बाई म्हणून पाहतो व तिला बाईच्या पारंपरिक चौकटीत बसवून तिच्यावर बाईपणाचा ठसा उमटवितो. त्यामुळे पुढे या स्त्रीला सबंध आयुष्यात 'बाई म्हणूनच जीवन जगावे लागते. हेच आजच्या स्त्रीचे आणि समाजव्यवस्थेचे खरे स्वरूप आहे.

आज मोकळेपणाने वावरणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की, आजची स्त्री ही पुरूषांच्या गुलामगिरीतून मुक्त झाली आहे असे वाटायला लागते. मात्र काही अपवादात्मक ठिकाणीच हे चित्र बघावयास मिळते. शतकानुशतकांचा विचार केल्यास पन्नास वर्षापूर्वी स्त्रियांचे स्वातंत्र्य हा भयावह विषय होता. भारतीय स्त्री जीवनाचा प्राचीन काळापासून १८ व्या १९ व्या शतकापर्यंतचा इतिहास बघितल्यास काही घटनाप्रसंग, चालिरीती, रूढी, परंपरा स्त्री स्वातंत्र्यासाठी फारच प्रतिकूल ठरतात. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. पुरूषाच्या अधिपत्याखाली राहून तिने फक्त घर सांभाळावे, पुरूषाच्या अंकीत राहून त्याच्या मर्जीप्रमाणे आपले जीवन कंठावे, अशी तिची अवस्था होती. "जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व अवस्थांमध्ये स्त्रियांना पुरूषांपेक्षा हीन लेखले जाते, हे एक ऐतिहासिक सत्य आहे.[२] या समाजव्यवस्थेत एक उपभोग्य वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाई. शारीरिक गरजांपलीकडे माणसाच्या आणखी काही गरजा असतात हे स्त्रीच्या बाबतीत पद्धतशीरपणे विसरले गेले. त्यामुळे तिच्या शरीराचा विकास एका मर्यादेपर्यंत येऊन थांबला. आत्मगौरव, स्वाभिमान, आत्मविश्वास, स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि सामाजिक कार्यात तिचा सहभाग यासारख्या तिच्याही काही इच्छा असतात, गरजा असतात ही जाणीव या काळातील पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेला झाली नाही. त्यामुळे या काळातील स्त्रीचा कोंडमारा झाला. त्यातूनच तिच्यात परावलंबित्व आले. या काळातील समाजव्यवस्थेलाही हेच हवे होते. स्त्रीवर पुरूषाने मिळविलेला हा विजय होता. स्त्रियांमध्ये निर्माण झालेली ही नकारात्मक भावना बदलण्याची गरज स्त्रीवाद्यांना वाटली, त्यामुळेच 'मनुस्मृती' या ग्रंथाचे दहन करण्यात आले. "फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, हिंदुस्थानातील चलेजावची चळवळ यांचे नेतृत्व स्त्रियांनी घेतले नसेल, पण त्यातील त्यांचा सहभाग त्यांची स्वातंत्र्याची भूक दाखविणारच आहे."[3] समाजव्यवस्थेने स्त्रीयांना समान हक्क, समान दर्जा, स्वातंत्र्य दिले पाहिजे आणि समाजव्यवस्था जर हे देत नसेल तर स्त्रीने त्या समाजव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले पाहिजे. ही आजची स्त्रीवादी विचारसरणी आहे. पारंपरिक पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीने पुरूषाची गुलामगिरी सहन केली आहे. आश्चर्य म्हणजे चुकूनही बंड न करता आपला चेहरा कोणालाही दिसू नये म्हणून पदराने तोंड झाकून आपला चेहरा लपवत राहिली आहे. पायाचे नखही कोणाच्या दृष्टीस पडू नये, म्हणून अंगभर वस्त्र नेसायचे आणि विधवा झाले की, मुंडण करून स्वतःला विद्रूप करून घ्यायचे. पांढरे किंवा लाल वस्त्र परिधान करायचे, कपाळावरचे कुंकू पुसायचे, अंगाखांद्यावरचे दागिने फेकून द्यायचे, उपासतापास काढायचे, घरात गुलामासारखे राहायचे. सर्व इच्छा, आकांक्षा, प्रेम, जिव्हाळा, शारीरिक भावना चिरडून टाकून कचऱ्यात फेकून द्यायच्या. कुणी कामावर जाण्यासाठी निघाले तर त्याला आडवे सुद्धा जायचे नाही. नियम आणि व्रत यांनी स्वतःला बांधून टाकायचे. हे असेच चित्र वर्षानुवर्ष बघावयास मिळत होते. वर्षानुवर्ष कशाला ? काही वर्षापूर्वी वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी...अरुणाचल प्रदेशातील एका तेरा वर्षाच्या मुलीबरोबर एक साठ वर्षाचा जरठ म्हातारा लग्न करण्यास निघाला. ही बातमी वाचून आश्चर्य वाटले आणि आजची स्त्री खरचं स्वतंत्र आहे का ? हा विचार मनात नव्याने रेंगाळायला लागला. आजची स्त्री खरेच स्वतंत्र आहे का? तिचे अस्तित्व, तिच्या भावना, कल्पना, विचार यांना मोकळ्या वातावरणात खरेच स्थान आहे का? हा विचार मनात घर करून गेला. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी आजही स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आहेत. तिला स्वतःचे आयुष्य नाही, अस्तित्व नाही, तिच्या विचारांची, भावनांची, दखल घेतली जात नाही. ऋग्वेदाच्या काळातील समाज स्त्रियांच्या बाबतीत

शिक्षण न घेतल्यामुळे इथल्या बहुजनांच्या अनेक पिढ्या बरबाद झाल्या. या स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी फुले दाम्पत्याने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्याच प्रयत्नातून म. फुले यांनी १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा भिडयांच्या वाडयात सुरु केली आणि भारतीय महिलांच्या जीवनातील सोनेरी पर्वाला सूरूवात झाली. म. फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई गोपाळ यासारख्या महिला समाजसुधारकांनी पुढाकार घेऊन स्त्रीला तिच्या 'चूल आणि मूल या जगातून बाहेर काढले. स्त्रिया शाळेत जाऊ लागल्या, शिक्षण घेऊ लागल्या, आपल्या पायावर उभ्या राहिल्या. विसावे शतक संपले आणि स्त्री सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोहोचली त्यातूनच अलीकडच्या काळातील उदाहरणे द्यायची झाल्यास बहिणाबाई चौधरी, गोदावरी परुळेकर, अनुताई वाघ, श्रीमती इंदिरा गांधी, डॉ. किरण बेदी, कल्पना चावला, प्रतिभाताई पाटील, सरोजिनी नायडू, मृणाल गोरे, पी. टी. उषा, सानिया मिर्झा, यासारख्या अनेक महिलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपली कामगिरी दाखवून जागतिक पातळीवर देशाचे नाव कमविले. तेंव्हा आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करते आहे. शिक्षणामुळे स्त्रियांचा विकास होतो, हे बाबासाहेबांना कळून चुकले होते. ते म्हणायचे, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.[८] ही बाबासाहेबांची भविष्यवाणी खरी ठरली. उशिरा का होईना महिला शिकू लागल्या आहेत, उच्चशिक्षण घेत आहेत; पण आज जागतिकीकरणामुळे, खासगीकरणामुळे, ग्लोबलायझेशनच्या युगामुळे नोक-यांचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे अनेक स्त्रिया नोकरीच्या मागे न लागता गृहउद्योग करू लागल्या आहेत. स्त्रियांच्या मनातील न्यूनगंड जोपर्यंत कमी होत नाही, तोपर्यंत तुमच्या आमच्या घरात इंदिरा गांधी, कल्पना चावला, सानिया मिर्झा, डॉ. किरण बेदी, प्रतिभाताई पाटील, सरोजिनी नायडू, मृणाल गोरे यासारख्या कर्तृत्ववान स्त्रिया जन्म घेणार नाहीत असे मला वाटते.

भारतीयच काय पाश्चिमात्य देशातील पितृसत्ताक समाजव्यवस्था मूल जन्माला आल्यापासूनच त्याला पारंपरिक चौकटीत बसविते. पुढे या मुलालाही हीच आपली चौकट आहे असे वाटून त्याप्रमाणे ते जीवन जगते. स्त्रीलिंगी अपत्य जन्माला आले की, तिला बाईपणाच्या चौकटीत बसविले जाते. तिला वेगवेगळ्या प्रतिमा लावल्या जातात, स्त्री देवता, माता, पत्नी, दासी, कामिनी, स्त्री म्हणजे अबला, नाजूक, लाजरी, भित्री, निसर्गतःच दुबळी अशा काही प्रतिमा लावल्या जातात. "अबला, माता, दासी किंवा देवता म्हणून जी स्त्रीरूपे साहित्यात येतात ती पुरुषप्रधान संस्कृतीचा आविष्कार असतात.[९] स्त्रियांनी या प्रतिमांमधून बाहेर यावे, या वर्तुळातून बाहेर पडावे, माणूस म्हणून जगावे. हीच आजच्या समाजव्यवस्थेची खरी गरज आहे असे मला वाटते.

**संदर्भ टीपा :-**

१ डॉ. शिंदे संजय, साहित्य विचार आणि परिवर्तन प्रत्यय, प्रबोधन प्रकाशन- औरंगाबाद, प्र. आ., एप्रिल - २०१५, पृ. १३६
२ साळुंखे आ. ह., 'हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङमय गृह, मुंबई, बा.आ., जानेवारी- २०१५, पृ. ११
३ डॉ. धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजना, दिलीपराज प्रकाशन, प्र. आ. पुणे- १९९३, पृ. ०८
४ कर्वे स्वाती, स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, प्र. आ. पुणे- २००७, पृ. १७
५ डॉ. शिंदे संजय, उ. नि. १, पृ. १३६
६ डॉ. वरखेडे मंगला, स्त्रियांचे कथालेखन : नवी दृष्टी नवी शैली, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, प्र.आ. २००५, पृ. ०६
७ डॉ. शिंदे संजय, उ. नि. १, पृ. १३७
८ तत्रैव, पृ. १३७
९ डॉ. धोंगडे अश्विनी, उ. नि. ३, पृ. ०६



Scanned by CamScanner